I J R S S I S, Vol. VII, Issue (1), January 2019 : 01- 06 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# ग्रामीण महिलांची लघुउद्योगातील वाटचाल – एक अध्ययन

**प्रा. डॉ. माधुरी ना.कोकोडे**

श्री. गोविंदप्रभू कला व वाणिज्य महाविद्यालय, तळोधी (बा.), जि. चंद्रपुर (म.रा.)

E-Mail :- drmn_kokode@rediffmail.com

**गोषवारा :**

'स्त्री आणि उद्योजकता' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कुशल गृहीणी ज्याप्रमाणे दूरदृष्टी ठेवून व धाडस करून नियोजन करते, आपल्या कुटूंबाचे उद्दिष्ट साध्य करते त्याचप्रमाणे उद्योजकतेमध्ये ती मागे पडू शकत नाही. केवळ त्यांना गरज असते ती योग्य संधीची. पूर्वी 'चुल आणि मुल' या चौकटीत कैद असलेल्या महिला चौकट तोडून यशाची एक एक शिखरं पादाक्रांत करू लागल्या आहेत. चेहऱ्यावर स्वकर्तृत्वाची चमक, सचोटी या जोरावर आजच्या महिला पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात काम करीत आहेत. शिस्त बचत आणि कुटूंबाची सुरक्षितता यात त्यांचा महत्वपूर्ण वाटा आहे. महिला उद्योजकांपुढे आव्हाने भरमसाट आहेत जसे उद्योगांची सुरूवात करतांना येणाऱ्या असंख्य अडचणींना पुढे जावे लागते. विविध संसाधणे एकत्रीकरण करणे, कामगार शोधणे, मालाचे वितरण करण्यास योग्य माध्यम व माहिती मिळवून बाजारपेठेत विकणे महिलांचा सहभाग बघता जागतिक स्तरावर महिला उद्योजकांचे प्रमाण $\frac{4}{3}$ इतके दिसते. भारतातील ग्रामीण महिलांचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे $\frac{1}{4}$ आहे. भारतात ग्रामीण भागातील महिलाच उद्योजक ह्या लघु–उद्योगामध्ये अधिक प्रमाणात आहे.स्त्री म्हणजे नवनिर्माण उपजतच जिला नवनिर्माणाचे वरदान लाभले आहे. स्वत:ला सक्षम करणे आणि रोजगारनिर्मिती करून अनेकांना उपजिविकेचे साधन निर्माण करून देण्याच कौशल्य तिच्यात अंतर्गत आहे. आज बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम होतांना दिसते. ग्रामीण स्त्रिया शेती, घर आणि संसार सांभाळून यासोबतच जोडधंदा म्हणून मत्स्यशेती, कुक्कुटपालन इत्यादी लघुउद्योगात आपले अस्तित्व निर्माण करीत आहे.

**बिजशब्द :** लघुउद्योजकता, ग्रामीण महिला, भारत.

## प्रस्तावना :

उद्योजकता ही एक अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. प्रत्यक्षात कोणतीही अनुकुलता नसतांना काही तरी नव्याने उत्पन्न करण्याची क्षमता असे न मानता मानवी जीवनाची व समाजाच्या व्यवस्थेची सर्व क्षेत्रे आणि मनुष्याचे सर्व व्यवहार उद्योजकतेच्या परिघामध्ये अंतर्भूत आहेत. १६ व्या शतकात उद्योजकता संकल्पना लष्करी मोहिमांचे नेतृत्व करणारी व्यक्ती, या अर्थाने वापरण्यात आली. त्यानंतर इतर क्षेत्रातील महिला किंवा धाडसांसाठी या संकल्पनेचा वापर केला गेला. Entrepreneur (उद्योजक) या शब्दाचा फ्रान्समध्ये सरकारी रस्ते, तटबंदी, पुल, बंदरे यांच्या बांधकामाचे कार्य पार पाडण्याऱ्या कंत्राटदाराला म्हटले जात असे. पुढे कामाच्या आघाडीवर राहणारा, नेतृत्व करणारा, आर्थिक व्यवहारात स्वत:ला गुंतवणारा इ. अर्थाने हा शब्द कालानुरूप वापरण्यात आला. म्हणजे Entrepreneur या शब्दातच विविध छटा आढळतात. त्यामुळे उद्योजक व्यक्ती देखील छटांनी व्यापलेली असते.'स्त्री आणि उद्योजकता' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कुशल गृहीणी ज्याप्रमाणे दूरदृष्टी ठेवून व धाडस करून नियोजन करते, आपल्या कुटूंबाचे उद्दिष्ट साध्य करते त्याचप्रमाणे उद्योजकतेमध्ये ती मागे पडू शकत नाही. केवळ त्यांना गरज असते ती योग्य संधीची. पूर्वी 'चुल आणि मुल' या चौकटीत कैद असलेल्या महिला चौकट तोडून यशाची एक एक शिखरं पादाक्रांत करू लागल्या आहेत. चेहऱ्यावर स्वकर्तृत्वाची चमक, सचोटी या जोरावर आजच्या महिला पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात काम करीत आहेत. शिस्त बचत आणि कुटूंबाची सुरक्षितता यात त्यांचा महत्वपूर्ण वाटा आहे. महिला उद्योजकांपुढे आव्हाने भरमसाट आहेत जसे उद्योगांची सुरूवात करतांना येणाऱ्या असंख्य अडचणींना पुढे जावे लागते. विविध संसाधणे एकत्रीकरण करणे, कामगार शोधणे, मालाचे वितरण करण्यास योग्य माध्यम व माहिती मिळवून बाजारपेठेत विकणे महिलांचा सहभाग बघता जागतिक स्तरावर महिला उद्योजकांचे प्रमाण $\frac{4}{3}$ इतके दिसते. भारतातील ग्रामीण महिलांचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे $\frac{1}{4}$ आहे. भारतात ग्रामीण भागातील महिलाच उद्योजक ह्या लघु–उद्योगामध्ये अधिक प्रमाणात आहे.स्त्री म्हणजे नवनिर्माण उपजतच जिला नवनिर्माणाचे वरदान लाभले आहे. स्वत:ला सक्षम करणे आणि रोजगारनिर्मिती करून अनेकांना उपजिविकेचे साधन निर्माण करून देण्याच कौशल्य तिच्यात अंतर्गत आहे. आज बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम होतांना दिसते. ग्रामीण स्त्रिया शेती, घर आणि संसार सांभाळून यासोबतच जोडधंदा म्हणून मत्स्यशेती, कुक्कुटपालन इत्यादी लघुउद्योगात आपले अस्तित्व निर्माण करीत आहे. स्त्रियांची मानसिक शक्ती जास्त आहे. प्रतिकुल परिस्थिती असुनही त्यातुन मार्ग काढण्याची हातोटी त्यांच्याकडे अंगभूत असते.

कुटूंबाचे विघटन, वाढत्या जबाबदाऱ्या, वाढती महागाई, जीवनमान उंचावण्याची तीव्र आकांक्षा, स्वत:ची ओळख निर्माण करण्याची दुर्दम्य इच्छा अशा अनेक कारणामुळे महिला आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होण्याकरीता प्रयत्नशील आहेत. त्याचाच परिणाम म्हणून शहरीच नव्हे तर ग्रामीण महिलांनी उद्योजकतेच्या क्षेत्रामधील आव्हाने स्विकारलेली आहेत.

**उद्दिष्टे :**

१) भारतातील ग्रामीण महिला व लघुउद्योजकता यांचा सहसंबंध अभ्यासणे.

२) ग्रामीण उद्योजक महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्तराचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण महिलांचा उद्योजकतेतून होणाऱ्या विकासाच्या वाटचालीचा शोध घेणे.

**गृहितके :**

१) भारतातील ग्रामीण महिला व लघुउद्योग यात धनात्मक संबंध दिसून येतो.

२) लघुउद्योगामुळे ग्रामीण महिलांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावलेला आहे.

३) लघुउद्योगामुळे स्त्री सबलीकरण दिसून येते.

**अध्ययन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ग्रामीण महिला व लघुउद्योग यांचा सहसंबंध, समाजातील रूढी, परंपरा, चालिरीती, अशिक्षितपणा, अज्ञान यामुळे येणारे अडथळे शोधून त्यावर उपाययोजना सुचव्यावा लागतात म्हणून 'निदानात्मक संशोधन आराखडयाचा' अवलंब केलेला आहे. विज्ञान प्राप्ती किंवा विज्ञान विकास आणि एखाद्या समस्येचे वास्तविक सत्य जाणने व त्यावर निरीक्षणात्मक उपाय योजना सूचविणे या संशोधनात्मक अध्ययनाला 'निदानात्मक संशोधन आराखडा' म्हणतात.

**तथ्य संकलन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तथ्य संकलना करीता अनेक अहवाल, ग्रंथ, मासिक, संकेत स्थळ (Website) शोध निबंध व दैनिक वर्तमानपत्रे यांचा आधार घेतलेला आहे.

तथ्याचे आशय, विश्लेषण वस्तुनिष्ठपणे केलेले आहे. ज्याद्वारे भारतीय ग्रामीण महिलांचे व लघुउद्योग या संदर्भातील वास्तवता स्पष्ट करण्यास मदत झालेली आहे.

**ग्रामीण महिलांची –उद्योजकता :**

उद्योजकता ही एक प्रवृत्ती असून ती ज्या प्रमाणे पुरूषांमध्ये आहे तशीच महिलांमध्ये देखील आढळून येते. महिला ग्रामीण असो वा शहरी उद्योजकतेची वृत्ती सारख्याच प्रमाणात असू शकतात. फक्त प्रगटीकरणाच्या पध्दती पूरक आहे. कारण ग्रामीण महिलांच्या, उद्योजकता प्रगटीकरणाची कारणे शहरी महिला उद्योजकतेपेक्षा वेगळी आहेत. ग्रामीण किंवा खेडे विभागात राहून एखादा उपक्रम संघटीत करण्याच्या महिलांना ग्रामीण महिला उद्योजकतेचा दर्जा देणे हे विकासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.

ग्रामीण महिला उद्योजकता आणि महिला सक्षमिकरणाला योग्य संधी देण्याचे महान कार्य बांगला ग्रामीण बॅकेचे प्रणेते व शांतता नोबेल ॲवार्डचे मानकरी डॉ. महमद युनूस यांनी स्वयंसहाय्य गटाची सुरवात करून महिलांमधील विविध कला गुणांना वाव दिला. तळागाळातील आदिवासी, मागासवर्गीय महिलांनी सांसारिक जबाबदारी सांभाळून स्वत:तील उद्योजकतेला सिध्द करून विशिष्ट वर्गाची या क्षेत्रातील मक्तेदारी मोडीत काढली आहे. एक मेका साह्य करू अवघे धरु सुपंथ। यानुसार एकमेकींना साह्य करून बचत गटाच्या माध्यमातून विविध व्यवसाय, उद्योगांची कास धरून स्वत:च अस्तित्व निर्माण केलं आहे. आणि सोबतच कुटूंबाचा, गावाचा, समाजाचा विकास करत आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रातून अडीच लाखापेक्षा अधिक बचत गट असून ३६ लाख महिला संघटित झाल्या आहेत.

**विविध क्षेत्रातील महिला लघुउद्योग :**

उद्योग क्षेत्रात नावलौकिक कमावलेल्या अनेक महिलांचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण आहे. अर्थात आपल्या उद्योजकतेचा ठसा उमटविणाऱ्या सर्वच महिलांची कामगीरी समाजासमोर प्रकर्षाने येत नाही हेही तितकेच खरे. भारतीय स्त्री उद्योजक प्रथम व शेवटी स्त्रीच आहे. 'स्त्री' असणे हे तिच्यासाठी फार मोठे आव्हान आहे. कारण या समाजाने स्त्रियांची कर्तव्ये निश्चित करून दिलेली आहेत. मुलांचे संगोपण, कुटूंब, पतिची सेवा, कुटूंबातील एकोपा आणि शांतता महिलांकरीता प्राथमिकतेच्या असतात. याशिवाय असुरक्षिततेची भावना हे तिच्यासाठी फार मोठे आव्हान आहे. परंतू जागतिकीकरणामुळे महिलांनी 'स्त्रीत्वाचे आव्हान स्विकारून उद्योजकाचा मान प्राप्त केला आहे.

जळगाव जिल्हयातील बहादरपूर येथील मॅगसेस पुरस्काराने पुरस्कृत झालेल्या निलिमाताई मिश्रा यांनी १० वर्षात २० हजार बचत गटांची स्थापना करून महिलांना उद्योजकतेतून आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविले आहे. येथील महिलांनी तयार केलेल्या गोधळींना थेट युरोप, ऑस्ट्रेलिया मधून मागणी आहे. दरमहा पाच हजार कापडी पिशव्या, तिखट–हळद, कुरडया, पापड सांडगे हे खाद्यपदार्थ दूर परदेशापर्यंत जातात. महिलांना स्वावलंबी करण्याच्या उपक्रमामुळे निलीमा ताईंना मॅगसेस पुरस्कार मिळाला.

ग्रामीण भागात उत्पादीत होणारे चिंच, बोर, आवळा, लिंबू, करवंद, आंबा यासारख्या फळांपासून सॉस, लोणचे, जाम जेली, मसाले असे अनेक खाद्यपदार्थ तयार करून चंद्रपूर जिल्हयातील नागभिड तालुक्यातील तळोधी (बालापूर) येथील सौ. सुचिता सुभाष पाकमोडे यांनी 'अर्थव' या नावाने फार मोठा गृहउद्योग साकारला आहे.

ग्रामीण भागाती स्त्रीया रेशन दुकानात जीवनावश्यक वस्तु ठेवनू ती दुकाने स्वत: चालवून उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करत आहेत. भारतीय शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने जैविक खताची निर्मिती या बाबतचे प्रशिक्षण घेवून जैविक खताचा उद्योग करू पाहत आहेत. ग्रामालय मायक्रोफायनान्स (तामिळनाडू) GMF अकोला जिल्ह्यातील बार्शिटाकळी तालुक्यातील आकंदा रूस्तमाबार येथील महिलांना जोगेश्वर महाराज शेतकरी महिला बचत गट स्थापन कररून मिनी दालमिल दाल उद्योगाची उभारणी केली आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या. तसेच विविध कृषी प्रदर्शनातून स्टॉल त्यातून मुग, तुर, चना, उडीद दाळीची विक्री, झुनका भाकर केंद्र स्टॉल लावून त्यात भर टाकली. या व्यतिरिक्त ०.६० हेक्टर शेत वाहितीत घेवून त्यातून कांदा बिजोत्पादन पालेभाज्या लावून २० ते ३० हजार रूपये उत्पन्न मिळविले आहे. बचतगटाच्या अंतर्गत झेरॉक्स मशिन केंद्र महिन्याला ३ ते ४ हजार रूपये उत्पन्न मिळवून महिलांच्या पंखात बळ निर्माण केलेलं आहे.

महिलांसाठी औद्योगिक उद्योजक धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले आहे. या धोरणामुळे महाराष्ट्र महिला संचालित उद्योगांचे प्रमाण हे ९ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत वाढविणे शक्य होणार आहे. आणि पुढील पाच वर्षात ४ ते २० हजार महिला उद्योजकामार्फत दोन हजार कोटी मूल्यांची गुंतवणूक होणार आहे.

अगरबत्ती, चहाची पावडर, मसाले, मिरची, हळद पावडर, राजगीऱ्याचे लाडू, शेंगदाण्याची चिक्की, फिनाईल, टॉयलेट क्लीनर, डीशवॉश यासारख्या अतिशय उपयोगी वस्तुंची निर्मिती आणि विक्री करण्याचा उद्योग सौ. विजया आडे करत आहेत. मौदा पंचायत समितीच्या अंतर्गत येणाऱ्या मौदाच्या स्टॉफ कॉलनीत महिला बचत गटातून सौ. विजया आडे यांनी उद्योजक म्हणून मानाचे स्थान प्राप्त केले आहे. डेअरी, कुक्कुटपालन, पिठाची गिरणी, शेवया, लोणचे, पापड, पनीर, मेतकुट, शरबत बनविणे, पाळणाघर चालविणे, ज्वेलरी विकणे, घरगुती खाद्यपदार्थ, गृहउपयोगी वस्तु इत्यादी उद्योगात ग्रामीण महिला कार्यरत आहेत. वाती–फुलवाती, अगरबत्ती व्यवसाय, कौशल्य अन्य वस्तू दैनंदिन जीवनात लागणारे खाद्यपदार्थ तयार करून अर्थाजन करत आहेत. गोधडी शिवणे, टेलरिंग, खानवळ, झुणका भाकरी केंद्र, ब्युटी पार्लर असे महिला उद्योजक संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या निरिक्षणातून ग्रामिण महिला आणि उद्योजकता यात धनात्मक सहसंबंध दिसतो.महिला संघटनात्मक सहकारी संस्था स्थापन करून दुग्धव्यवसायाचे संघटन करून मोठया उद्योजक झाल्या आहेत. सोबतच दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन करून शहरी बाजारपेठेत उत्तम स्थान प्राप्त केले आहे.

**निष्कर्ष :**

१) बदलत्या काळानूसार प्रतिकुल आर्थिक परिस्थितीवर मात करून ग्रामीण महिलांनी उद्योजकतेमध्ये सक्षमतेने पाऊल टाकले आहे.

२) कुटूंबाच्या उपजिवीकेसाठी सातत्याने कष्ट करणाऱ्या महिला स्वयंसहाय्य बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण उद्योजक म्हणून समाजात स्वत:ची ओळख निर्माण केली आहे.

३) ग्रामीण भागात कर्जबाजारीपणाचे प्रमाण अधिक असल्यामुळे कुटूंबाचे पालणपोषण या जबाबदारीमुळे महिला उद्योजगतेकडे वळत आहेत.

४) उद्योजक म्हणून पुढे येणाऱ्या महिलांना समाजात चांगला दर्जा प्राप्त झाला आहे.

५) ग्रामीण महिला उद्योजकता हे स्वयंसहाय्य बचत गट, कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्धसंकलन, छोटे छोटे दुकान, छोटे कुटीर उद्योग इत्यादीपूरते मर्यादित दिसते.

६) परंतू अशिक्षितपणा व अज्ञानामुळे महिलाकरीताअडचणी निर्माण होतांना दिसतात.

७) ग्रामीण महिलांचे लघु उद्योगातील सहभाग वाढलेला आहे.

८) ग्रामीण लघु उद्योगातील सहभागामुळे आर्थिक व सामाजिक स्तर उंचावलेला आहे.

**शिफारशी :**

१) भारतीय ग्रामीण महिलांच्या उद्योजकतेतील वाटचाल यासाठी प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा, मेळावे व चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करण्याची गरज आहे.

२) ग्रामीण महिलांमध्ये स्वावलंबतेच्या वृत्तीची जोपासना करावी.

३) महिलांना अर्थसहाय्याकरीता उत्तम मार्गदर्शन व मोफत प्रशिक्षण दिले जावे.

४) महिला उद्योजकांच्या राज्य परिषद आयोजीत करावी.

५) महिला उद्योजकांची स्वतंत्र डायरी, उद्योगाचे पत्ते मोबाईल, ई–मेलसह प्रकाशित करावे.

**संदर्भ :**


१) उद्योजकता :
योगिराज हरीशचंद्र देवकर

२) ग्रामिण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन :
गंगाधर कराळे

३) महिला स्वयंसहाय्यता बचत गट :
प्रा. एम. यू. मुलाणी

४) उद्योजकता मासिक :
ऑक्टोबर २०१०, जाने, जून, ऑगष्ट २०११

५) लोकमत, लोकराज्य :

६) https://udyojak.org

७) https://www.bookganga.com


❖❖❖❖